# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**नॅक मानांकित 'अ' श्रेणी**

**जा. क्र.** यचममवि/डॉ.बा.आ.अध्यासन/२०२५/525 **दिनांक :** २४/११/२०२५

## परिपत्रक

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार आपल्या विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेचा तपशील खालीलप्रमाणे (झूम प्लटफॉर्मद्वारे)

**विषय** : **भारतीय संविधानाची ७५ वर्ष**

**दिनांक** : **२६ नोव्हेंबर २०२५**

**वेळ** : **सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत.**

तरी सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, शैक्षणिक सल्लागार, शैक्षणिक संयोजक, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी खालील क्यूआर कोड स्कॅन करून सदर कार्यशाळेत सहभागी व्हावे, ही विनंती.

**Zoom Meeting Link :**
https://us06web.zoom.us/j/85866881294?pwd=0UHpbxAyMXCJyPc56rrJPjb5uyTXbs.1

**Meeting ID : 858 6688 1294** **Passcode : samvidhan**

**Zoom Meeting**

कुलसचिव

**सोबत : कार्यक्रम पत्रिका**

**प्रत — माहितीसाठी व उचित कार्यवाहीस्तव**

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय
३. सर्व विद्याशाखा संचालक / विभाग प्रमुख/ केंद्र प्रमुख / कक्ष प्रमुखांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणून द्यावे.
४. सर्व मा. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र - अमरावती / छत्रपती संभाजीनगर / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे / कोल्हापूर / नांदेड यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले सर्व अभ्यासकेंद्र व विद्यार्थी यांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन * य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक * ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

आयोजित





## संविधान दिनानिमित्त

### एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळा

## विषय : भारतीय संविधानाची ७५ वर्ष

**कार्यक्रम पत्रिका (दि. २६ नोव्हेंबर २०२५)**

| | |
|---|---|
| **उद्‌घाटन सत्र (वेळ-सकाळी : १०.३० ते ११.००)** | |
| १०.३० ते १०.४५<br>१०.४५ते ११.०० | **अध्यक्ष :** **प्रा. डॉ. संजीव सोनवणे**<br>मा. कुलगुरू<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक<br>**प्रास्ताविक :** **प्रा. नागार्जुन वाडेकर**<br>प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन<br>**आभार:** डॉ. सुनील गावंडे |
| सकाळी<br>११.०० ते १२.०० | **सत्र पहिले (सकाळी: ११.०० ते १२.००)**<br>**वक्ते :** **प्रा. डॉ. अपर्णा कोत्तापल्ले**<br>प्रभारी प्राचार्य, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय,<br>छत्रपती संभाजीनगर<br>**विषय :** संविधान निर्मितीची पार्श्वभूमी आणि संविधानातील तत्वज्ञान<br>**सूत्रसंचालन:** डॉ. सुनील गावंडे<br>**परिचय:** डॉ. शायिन शेख<br>**आभार :** श्रीमती. रुपाली गायकवाड |
| **सत्र दुसरे (दुपारी: १२.०० ते १.३०)** | |
| दुपारी<br>१२.०० ते १.३० | **वक्ते :** **ॲड. प्रेषित सुरसे**<br>AOR, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली<br>**विषय :** भारतीय संविधानाचे स्वरूप व संरचना<br>**सूत्रसंचालन:** धम्मरत्न जावळे<br>**परिचय:** डॉ. प्रमोद वाघ<br>**आभार :** डॉ. संजय खरात |
| **विश्रांती (दुपारी: १.३० ते २.००)** | |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन * य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक * ज्ञानगंगा घरोघरी

| सत्र तिसरे (दुपारी: २.०० ते ३.३०) | |
|---|---|
| दुपारी<br>२.०० ते ३.३० | **वक्ते:** **सुनील तांबे**<br>लेखक व मुक्त पत्रकार, पुणे<br><br>**विषय** : भारतीय संविधानाची वाटचाल आणि उपलब्धी<br>**सूत्रसंचालन** : डॉ. विशाल आंबेडकर<br>**परिचय** : धम्मरत्न जावळे<br>**आभार** : डॉ. आनंद घोडवाडीकर |
| **सत्र चौथे (दुपारी ३.३० ते ५.००)** | |
| दुपारी<br>३.३० ते ५.०० | **वक्ते** : **प्रा. डॉ. दिलीप चव्हाण**<br>प्रमुख, भाषा साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br><br>**विषय** : भारतीय संविधानाची भविष्यातील दिशा<br>**सूत्रसंचालन** : डॉ. सुनील भारोडकर<br>**परिचय:** डॉ. बाळासाहेब दिघे<br>**आभार** : डॉ. पन्नालाल धुर्वे |
| **समारोप सत्र (सायं: ५.००-५.३०)** | |
| सायं:<br>५.००-५.३० | **प्रमुख उपस्थिती** **प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन**<br>मा. प्र. कुलगुरू<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक<br><br>**समारोप:** प्रा. नागार्जुन वाडेकर<br>प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन<br>**आभार:** डॉ. गोविंद कतलाकुटे<br>मा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन ★ य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक ★ ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475



# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आयोजित**

संविधान दिनानिमित्त एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळा

**विषय : भारतीय संविधानाची ७५वर्ष**

दि.२६ नोव्हेंबर २०२५



## अहवाल




### प्रस्तावना:


भारतीय संविधान दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० पासून सायं. ०५:३० वाजेपर्यंत करण्यात आले. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक महत्वाची जाणीव निर्माण करणे, भारतीय संविधानातील तत्वज्ञान संकल्पना स्पष्ट करणे तसेच संविधानाने नागरिकांना दिलेले अधिकार आणि कर्तव्ये यांचा बोध घडविणे हा होता. सदर कार्यशाळा ZOOM मीटिंग या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर संपन्न झाली असून, त्यासोबतच संपूर्ण कार्यशाळेचे YouTube Live द्वारे थेट प्रसारणही करण्यात आले. या कार्यशाळेला ५०० हून अधिक विद्यार्थी, समंत्रक आणि श्रोत्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## उद्घाटन सत्र - सकाळी : १०:३० ते ११:००

**अध्यक्ष** : प्रा. डॉ. संजीव सोनवणे, मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
**प्रास्ताविक** : प्रा. नागार्जुन वाडेकर, प्रमुख,डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन.
**सूत्रसंचालन व आभार** : डॉ. सुनील गावंडे

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.३० वाजता करण्यात आली. प्रारंभी एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी या प्रास्ताविक केले. आपल्या मनोगतामध्ये त्यांनी भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान तसेच संविधानाच्या ७५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा सादर केला. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजीव सोनवणे, माननीय कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी आपल्या भाषणात नागरिकांचे मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये यामध्ये समतोल राखल्यास समाजात समस्या व आव्हाने निर्माण होणार नाहीत, असे मत व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना संविधानातील मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सुनील गावंडे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी सर्व मान्यवर पाहुणे, सहभागी प्राध्यापक, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी व समन्वयक यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. या राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सहभागी सदस्यांनी कार्यशाळेचे आयोजक आणि कार्यशाळेतील व्याख्यात्यांचे विशेष कौतुक केले.






## सत्र पहिले - सकाळी ११:०० ते दु. १२:००


**वक्ते** : प्रा. डॉ. अपर्णा कोत्तापल्ले, प्राचार्य, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
**विषय** : संविधान निर्मितीची पार्श्वभूमी आणि संविधानातील तत्वज्ञान
**सूत्रसंचालन** : डॉ. सुनील गावंडे
**परिचय** : डॉ. शायिन शेख
**आभार** : रुपाली गायकवाड

संविधान दिनानिमित्त आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेचे पहिले सत्र सकाळी ११.०० वाजता सुरू झाले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. सुनील गावंडे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट विशद करून

उपस्थित मान्यवर वक्त्या व सहभागी यांचे हार्दिक स्वागत केले. त्यानंतर डॉ. शायिन शेख यांनी सत्राच्या प्रमुख वक्त्याचा सविस्तर परिचय करून दिला. त्यांनी प्रा. डॉ. अपर्णा कोत्तापल्ले, प्राचार्य, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचा शैक्षणिक व प्रशासकीय अनुभव, संविधानविषयक त्यांचे योगदान व अभ्यास याविषयी माहिती दिली.


प्रा. डॉ. अपर्णा कोत्तापल्ले यांनी "संविधान निर्मितीची पार्श्वभूमी आणि संविधानातील तत्वज्ञान" या अत्यंत महत्वाच्या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात भारतातील घटनात्मक विकासाचा सविस्तर आढावा घेत १९०९ चा कायदा (मॉर्ले—मिंटो सुधारणा), १९१९ चा कायदा (मॉन्टॅग्यू—चेम्सफर्ड सुधारणा) आणि १९३५ चा भारत सरकार कायदा यांचे महत्त्व स्पष्ट केले. या कायद्यांच्या माध्यमातून भारतात प्रतिनिधित्व, अधिकार आणि प्रादेशिक स्वायत्ततेची संकल्पना कशी क्रमशः विकसित होत गेली, याचे त्यांनी सोप्या व प्रभावी पद्धतीने विवेचन केले. भारतीय संविधान निर्मितीसाठी झालेली दीर्घ प्रक्रिया, घटनासभेची ऐतिहासिक भूमिका तसेच संविधान निर्मितीत महिलांचे मोलाचे योगदान त्यांनी ठळकपणे अधोरेखित केले. यासोबतच भारतीय संविधानातील लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूलभूत मूल्ये जपण्याचे महत्त्व विशद केले. एकूणच त्यांचे व्याख्यान अत्यंत प्रेरणादायी ठरले.


सत्रादरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तथा समाजातील विविध स्तरातील व्यक्ती ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर सहभागी झाल्या. सहभागींकडून प्रश्नोत्तर सत्रामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्याख्यानानंतर अनेक सहभागी यांनी आपल्या प्रतिक्रिया व समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती रुपाली गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी माननीय वक्त्या, आयोजक, समन्वयक, सहभागी तसेच तांत्रिक सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.









## सत्र दुसरे - दुपारी १२:०० ते ०१:३०

| | |
|---|---|
| **वक्ते** | : ॲड. प्रेषित सुरशे, Advocate-on-Record, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली |
| **विषय** | : भारतीय संविधानाचे स्वरूप व संरचना |
| **सूत्रसंचालन** | : धम्मरत्न जावळे |
| **परिचय** | : डॉ. प्रमोद वाघ |
| **आभार** | : डॉ. संजय खरात |


संविधान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेतील दुसरे सत्र २६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०० ते १.३० या वेळेत पार पडले. 'भारतीय संविधानाचे स्वरूप व संरचना' या विषयावर आधारित हे सत्र कार्यशाळेचा केंद्रबिंदू ठरले. या सत्राचे प्रमुख वक्ते म्हणून सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड (AOR) ॲड. प्रेषित सुरशे यांनी मार्गदर्शन केले. सत्राचे सूत्रसंचालन धम्मरत्न जावळे यांनी केले, तर सत्राच्या प्रारंभी डॉ. प्रमोद वाघ यांनी वक्त्यांचा औपचारिक परिचय करून दिला.


ॲड. सुरशे यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात संविधान दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीकडे लक्ष वेधून केली. त्यांनी भारतीय संविधानाला काळानुसार बदलणारे, लवचिक व समाजाच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देणारे जिवंत दस्तऐवज म्हणून समजणे अत्यावश्यक असल्याचे नमूद केले. यानंतर वक्त्यांनी संविधानाच्या उद्देशीकेचे (Preamble) सविस्तर विवेचन केले. 'WE, THE PEOPLE OF INDIA' या प्रारंभीच्या विधानाच्या आधारे संविधानिक अधिकाराचे नैतिक व राजकीय अधिष्ठान स्पष्ट केले. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, प्रतिष्ठा आणि राष्ट्र हे प्रस्तावनेतील सहा मूलभूत आधारस्तंभ भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांना कसे आकार देतात, याचे त्यांनी विवेचन केले. सत्रात भारतीय नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या काही मूलभूत अधिकारांचे सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले. ॲड. सुरशे यांनी अनुच्छेद १४ मधील 'कायद्यापुढील समता व समान संरक्षण', अनुच्छेद १९ मधील 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य', संघटन स्वातंत्र्य, देशभर मुक्त संचार, निवास आणि व्यवसाय स्वातंत्र्य तसेच अनुच्छेद २१ मधील 'जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार' या तरतुदींचे महत्त्व स्पष्ट केले. या तरतुदी नागरिकांना संविधानाच्या संरक्षणाखाली सुरक्षित जीवन जगण्याचा अधिकार प्रदान करतात, यावर त्यांनी भर दिला. यानंतर त्यांनी अनुच्छेद ३२ चे सविस्तर विश्लेषण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुच्छेद ३२ ला भारतीय संविधानाचे "हृदय व आत्मा" असे संबोधले असल्याचे त्यांनी नमूद केले. मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार कसा संविधानाचा केंद्रबिंदू आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. हॅबिअस कॉर्पस, मँडेमस, प्रोहेबिशन, को-वारंटो आणि सर्टिओररी या पाच घटनात्मक तरतुदींचाचा उपयोग करून नागरिक कशा प्रकारे न्याय मिळवू शकतात, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

सत्राच्या शेवटच्या भागात सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्वाची चर्चा करण्यात आली. प्रत्येक प्रौढ नागरिकास कोणत्याही भेदभावाशिवाय मतदानाचा अधिकार मिळणे हे भारतीय लोकशाहीचे मूळ वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात १९१८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साउथबरो कमिटीसमोर केलेल्या विधानाचा उल्लेख करण्यात आला. औपचारिक सादरीकरणानंतर सत्राचा समारोप प्रश्नोत्तर सत्राने झाला. सहभागी सदस्यांनी भारतीय न्यायव्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्न विचारले. ॲड. सुरशे यांनी या सर्व प्रश्नांची स्पष्ट आणि विषयसाधक उत्तरे दिली, तसेच सत्रात चर्चेत आलेल्या घटनात्मक तरतुदींशी त्यांचे संबंधित पैलू जोडून सहभागींच्या शंकांचे निरसन केले. या संवादामुळे सत्र अधिक परस्परसंवादी आणि ज्ञानवर्धक ठरले.

सत्राची सांगता डॉ. संजय खरात यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने झाली. त्यांनी ॲड. सुरशे यांच्या मुद्देसूद व माहितीपूर्ण मार्गदर्शनाचे, सत्राचे अध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर आणि उपस्थित सर्व सहभागींच्या सक्रिय सहभागाचे कौतुक केले. एकूणच, संविधान दिनानिमित्त घेतलेले हे सत्र अत्यंत उपयुक्त, शैक्षणिक आणि संविधाननिष्ठ झाले.







**विश्रांती: दुपारी ०१:३० ते ०२:००**

## सत्र तिसरे - दुपारी ०२:०० ते ०३:३०

| | |
|---|---|
| **वक्ते** | : सुनील तांबे, लेखक व मुक्त पत्रकार, पुणे |
| **विषय** | : भारतीय संविधानाची वाटचाल आणि उपलब्धी |
| **सूत्रसंचालन** | : डॉ. विशाल आंबेडकर |
| **परिचय** | : धम्मरत्न जावळे |
| **आभार** | : डॉ. आनंद घोडवाडीकर |

तिसऱ्या सत्रात 'भारतीय संविधानाची वाटचाल आणि उपलब्धी' या विषयावर श्री. सुनील तांबे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. सत्राचे सूत्रसंचालन डॉ. विशाल आंबेडकर यांनी केले आणि धम्मरत्न जावळे यांनी वक्त्यांची ओळख करून दिली. तांबे सरांनी संविधानाचा ऐतिहासिक प्रवास, त्यातील प्रगतिशील तरतुदी आणि ईशान्य भारतासाठीच्या पाचवी व सहावी अनुसूचीवरील विशेष तरतुदींचे स्पष्टीकरण केले. आदिवासींचे सांस्कृतिक संरक्षण, स्वशासन आणि विकासासाठी या तरतुदींचे असलेले महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच ईशान्य भारताला देशाच्या मुख्य भूमीशी जोडणाऱ्या सिलिगुडी कॉरिडॉरचे रणनीतिक महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट केले. प्रश्नोत्तर सत्रात आरक्षण धोरणे,

उपवर्गीकरण, अनुसूचीतील फरक आणि धनगर आरक्षण यांसंबंधी महत्त्वाचे प्रश्न विचारले गेले. वक्त्यांनी सर्व प्रश्नांना ऐतिहासिक संदर्भासह समाधानकारक उत्तरे दिली. एकूणच हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक ठरले आणि संविधानातील विविधता व प्रगतिशील मूल्यांची सखोल समज विद्यार्थ्यांना मिळाली. सत्राची सांगता डॉ. आनंद घोडवाडीकर यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने झाली.













## सत्र चौथे - दुपारी ०३:३० ते ०५:००

**वक्ते** : प्रा. डॉ. दिलीप चव्हाण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**विषय** : भारतीय संविधानापुढील आव्हाने

**सूत्रसंचालन** : डॉ. सुनील भारोडकर

**परिचय** : डॉ. बाळासाहेब दिघे

**आभार** : डॉ. पन्नालाल धुर्वे

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनामार्फत संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त २६ नोव्हेंबर २०२५ रोजी 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेत चौथ्या सत्रात प्रा. दिलीप चव्हाण यांनी 'भारतीय संविधानाची भविष्यातील दिशा आणि आव्हाने' या विषयाच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले. भारतातील विविध सामाजिक समस्यांना उपाय हा भारतीय संविधानामध्ये अंतर्भूत आहे, त्यासाठी संविधानांची प्रामाणिक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे, प्रतिपादन डॉ. चव्हाण यांनी केले. सर्व प्रकारची विषमता हे देशाला प्रगतीला घातक असून सामाजिक - आर्थिक समता येथे प्रस्थापित होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरज आज निर्माण झाली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.








## समारोप सत्र - सायं. ०५.३० वा.

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | : डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| **प्रास्ताविक** | : प्रा. नागार्जुन वाडेकर, प्रमुख,डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन. |
| **सूत्रसंचालन** | : डॉ. सुनील भारोडकर |
| **आभार** | : प्रा. नागार्जुन वाडेकर, प्रमुख,डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन. |

सर्व महापुरुष व समाजसुधारकांच्या विचारांचे सार हे भारतीय संविधानात अंतर्भूत असून एक आदर्श नागरिक, समाज व राज्य कसे असावे, याबाबत सविस्तर विवेचन आपल्या संविधानात लिखित आहे. तोच सर्वश्रेष्ठ ग्रंथ आज ७५ वर्षापासून देशाला दिशादर्शन करत आहे व हाच ग्रंथ देशाला एकात्मता व बंधुभावाच्या तत्वात बांधून ठेवत आहे, असे प्रतिपादन प्रकुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी केले.

अध्यासन प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी या कार्यशाळेच्या संविधानाबाबत असलेले गैरसमज दूर होऊन समाजात संविधानात असलेले मानवी तत्वज्ञान पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच शेवटी त्यांनी कार्यशाळेचे उद्घाटक तथा विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि कार्यशाळेचा समारोप झाला.







**प्रा. नागार्जुन वाडेकर**
प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक (महाराष्ट्र)

# YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY, NASHIK

ज्ञानगंगा घरोघरी



## DR. BABASAHEB AMBEDKAR CHAIR

WORKSHOP ON

## "75 YEARS OF THE CONSTITUTION OF INDIA"

75 Years of Constitution



### CERTIFICATE OF PARTICIPATION

*This is to certify that* ***Dr.Sunil Bharodkar, Assistant Professor, School of Humanities and Social Sciences*** *has actively participated in the online one-day workshop on '75* ***Years of the Constitution of India'*** *on the occasion of Constitution Day, organized by the Dr. Babasaheb Ambedkar Chair, Yashwantrao Chavan Maharashtra Open University held on 26 November 2025.*

DR. BABASAHEB AMBEDKAR CHAIR * YCMOU, NASHIK * ज्ञानगंगा घरोघरी

**Prof. Nagarjun Wadekar**
Head,
Dr. Babasaheb Ambedkar Chair

Made for free with Certify'em